# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


=========================================================================

जावक क्रमांक – ७३८ /४०                                                    दिनांक :- ०२ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**म्हाडाच्या ३४ वसाहतींमध्ये स्वस्त दरातील वैद्यकीय सुविधा होणार उपलब्ध**

म्हाडाचा "आपला दवाखाना" उभारणीकरिता वन रूपी क्लिनिक सोबत सामंजस्य करार

मुंबई, दि. ०२ एप्रिल २०२५ – राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्वसामान्य नागरिकांना सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून सामाजिक बांधीलकीचे आदर्श उदाहरण जोपासले आहे. याअंतर्गत, म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील ११४ अभिन्यासातील ३४ वसाहतींमध्ये "आपला दवाखाना" ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी म्हाडा मुंबई मंडळाने मॅजिक डील हेल्थ फॉर ऑल या खाजगी संस्थेच्या वन रूपी क्लिनिक सोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा करार आज वांद्रे येथील म्हाडा मुख्यालयात करण्यात आला. याप्रसंगी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल , मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री मिलिंद बोरीकर , मंडळाच्या सहमुख्य अधिकारी श्रीमती वंदना सूर्यवंशी, म्हाडाचे उप मुख्य अधिकारी श्री अनिल वानखेडे तसेच वन रूपी क्लिनिक चे डॉ. राहूल घुले, डॉ.अमोल घुले आणि डॉ. मोहन नागरगोजे इत्यादि उपस्थित होते.

या योजनेच्या माध्यमातून संबंधित वसाहतींतील नागरिकांना परवडणाऱ्या दरात आवश्यक वैद्यकीय सेवा पुरविण्यात येणार आहेत.जसे वैद्यकीय तपासणी करिता नागरिकांकडून नाममात्र १ रुपया शुल्क आकारले जाणार आहे. तसेच इतर वैद्यकीय तपासण्या जसे रक्त तपासणी, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणी सारख्या सुविधा केवळ १० रुपयांमध्ये केल्या जाणार आहेत.

या योजनेअंतर्गत म्हाडातर्फे वन रूपी क्लिनिक संस्थेला म्हाडा वसाहतींच्या आवारात दवाखाना सुरू करण्यासाठी ४०० चौरस फुटांची जागा उपलब्ध करवून दिली जाणार आहे. या सुविधेचा फायदा म्हाडा वसाहतीतील नागरिकांव्यतिरिक्त सर्व सामान्य नागरिकांना देखील घेता येणार आहे.

आपला दवाखाना म्हाडाच्या कुलाबा कफ परेड, चेंबूर, पंतनगर- घाटकोपर, कन्नमवार विक्रोळी, महावीर नगर कांदिवली, प्रतिक्षा नगर, सायन, अंटोप हिल-वडाळा, आदर्श नगर-ओशिवरा, सांताक्रूझ अंधेरी, वांद्रे , जुहू, कुर्ला, मानखुर्द , माहीम, कांदिवली, बोरीवली येथील विविध म्हाडा वसाहतींमधून उभारण्यात येणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा





---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial